**P.R.O Office ,Crime Branch ,Pimpri Chinchwad**
**Address:- Office Of The Commissioner Of Police ,**
**Premlok Park Chinchwad,**
**Maharashtra - 411033**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# प्रेसनोट दिनांक - ३०/०४/२०२३

## दि.२९/०४/२०२३ रोजी रात्रौ ००.०० वा ते २४.०० वा पर्यत दाखल गुन्हे

**<u>भाग १ ते ५ चे गुन्हे</u>**

१.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | पिंपरी ४८५/२०२३ भादंवि कलम ३०७, ३९५, ३९७, ५०६, ४२७, आर्म ॲक्ट कलम ४ (२७), क्रिमीनल लॉ अमेटमेंट १९३२ चे कलम ७, महा पोलीस ॲक्ट कलम ३७(१) (३) सह १३५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २९/०४/२०२३ रोजी रात्रौ. ०१:१५ वा. चे सुमारास मेडिमार्ट मेडिकल शॉप, पिंपरी पुणे. |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०४/२०२३ रोजी १५.१५ वा. |
| फिर्यादी | :- | अर्जुन नानकचंद वाल्मिकी. वय २७ वर्षे, जात हिंदु वाल्मिकी, धंदा .मजुरी, रा.- बि.नं ०२, रुम नं ३७, अशोक नगर, लिंकरोड, पिंपरी पुणे. |
| आरोपी | :- | १)किरण प्रकाश डोंगरे, वय १९ वर्षे रा. मिलींद नगर पिंपरी पुणे,<br>२)प्रेम प्रकाश डोंगरे, वय १८ वर्षे रा सदर.<br>३)मोहित सिंग वय १९ वर्षे अंदाजे पुर्ण नाव पत्ता माहिती नाही<br>४)अनिकेत हातमकर. वय १९ वर्षे अंदाजे, पुर्ण नाव पत्ता माहिती नाही<br>५)सुबोध गायकवाड, वय १८ वर्षे अंदाजे पुर्ण नाव पत्ता माहिती नाही<br>६)अवि निंबाळकर वय १९ वर्षे अंदाजे पुर्ण नाव पत्ता माहिती नाही<br>७)आयुष वय १८ वर्षे अंदाजे पुर्ण नाव पत्ता माहिती नाही<br>८)राहुल यादव वय १९ वर्षे पुर्ण नाव पत्ता माहिती नाही<br>९)साईनाथ पाटोळे वय १९ वर्षे अंदाजे पुर्ण नाव पत्ता माहिती नाही व त्यांचे सोबत इतर ७-८<br>**आरोपी क्र १,४,८,९ अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद ता वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी हे मेडीमार्ट या मेडीकल दुकानात काम करित असताना फिर्यादी यांच्या तोंडओळखीचा आरोपी १ याने आरोपी २ ते ७ व त्यांचे सोबत इतर ७-८ इसम अशांसह येऊन मेडिकल दुकानातुन पाण्याची बाटलीचे पैसे मागितल्याचे कारणांवरुन तुला पैसे पाहिजेत काय? तुला आता सोडणार नाही, तुला आता खल्लास करुन टाकतो,के डी भाई के लडकों को पैसे मांगता कया,अभी खरालवाडी मे एक को फोड के आए है,वहा पे बहोत तोड फोड किया है,वैसे ही तेरा मेडीकल फोड देंगे,इधर सिर्फ के डी भाई का राज है, असे बोलुन मेडिकल दुकानात जबरदस्तीने घुसुन फिर्यादी यांना जिवे मारण्याचे उद्धेशाने डोक्यावर व हातावर लोखंडी धारदार कोयत्याने मारहाण करुन जबर जखमी करुन दुकानातील फ्रिजवर ठेवलेले २५००/- रुपये आरोपी १ याने जबरदस्तीने मालकाला धमकावुन काढुन घेवुन जाताना मेडिकल मधील फ्रिजमधील कोल्ड्रींक्सच्या बाटल्या जबरदस्तीने घेवुन व काउंटरवरील काचा फोडुन काउंटरचे ३०,०००/- रुपयांचे नुकसान करुन निघुन गेले. तसेच त्यांचे हातातील लोखंडी कोयते हवेत फिरवत आरडा ओरडा करुन सार्वजनीक शांततेचा भंग करुन समाजात दहशतीचे वातावरण निर्माण केले म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि कदम ९९२३२४७७४१ |

०२.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | दिघी १९०/२०२३ भा.दं.वि कलम ३५४(ड),३८७,५०९,५०७ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि.१३/०८/२०२२ रोजी पासून ते दि.२७/०४/२०२३ रोजी पर्यंत वेळोवेळी फिर्यादी यांना मोबाईल फोन कॉल्स, टेक्स्ट मेसेजेस आणि व्हाटसअॅप मॅसेज आणि व्हिडीओ व्दारे. |
| गुन्हा दाखल | :- | दि.२९/०४/२०२३ रोजी १३.४३ वा |
| फिर्यादी | :- | पीडीत महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | गौसपाक बाबु शेख रा.माळी गल्ली, मु.पो. बोरामणी, ता.दक्षीण-सोलापूर, जि.सोलापूर<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांनी खुलानामा (मुबारातनामा) व्दारे पती नमुद आरोपी याचे पासून, मुस्लीम धर्मशास्त्राचे नियमांप्रमाणे रितसर कागदोपत्री फारकत घेवून, सोलापूर शहर सोडून, फिर्यादी या मागील ०८ महिन्यांपासून, त्यांचे आई वडिल आणि भाऊ यांचे सोबत विभक्त राहत आहेत. तरी देखील यातील आरोपी हा त्याची लैंगिक इच्छापुर्तीची फिर्यादी यांचेकडून अपेक्षा ठेवून, सतत त्यांचा फोनव्दारे पाठलाग करणेचा प्रयत्न करुन, त्यांचे मोबाईल व्हाटसअॅपवर अश्लिल मॅसेजेस पाठवून, फिर्यादी यांचे स्त्रीमनास लज्जा उत्पन्न करत आहे. तसेच फिर्यादीवर कधीही अचानकपणे जिवघेणा हल्ला/हमला करण्याची भिती घालत असून, त्यामुळे यातील फिर्यादी आणि त्यांचे कुटुंबातील इतर सदस्य सतत प्रचंड तणाव आणि दहशती खाली वावरत आहेत. त्यामुळे आरोपी हा फिर्यादी व त्यांचे कुटुंबातील इतर सदस्यांचा मृत्यु घडवून, आणण्याची किंवा त्यांना जबर दुखापत करण्याची फिर्यादीला त्यांचे मोबाईल व्हाटसअॅपवर सतत जाणिव पुर्वक भिती घालत आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | मसपोफौ पवार ९७६६३९२५४७ |

३.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ५६९/२०२३ भा.द.वि.कलम ५०९, २९४, मो वा का कलम-१८५ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २९/०४/२०२३ रोजी दुपारी १५/३० वाजता भुमकर चौक वाकड पुणे याठिकाणी |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०४/२०२३ रोजी २३/१६ वा |
| फिर्यादी | :- | महीला फिर्यादी वय ४१ वर्षे |
| आरोपी | :- | संदीप काकासाहेब सुडके. वय-२४ वर्ष, रा-पांढवनगर, फेज-१, हिंजवडी, पुणे. **आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हया भुमकर चौक वाकड पुणे या मार्गे चारचाकी वाहन मारुती इग्निस नंबर एम एच १२ क्यु टी ४७५४ ही घेवुन राहते घरी जात असताना भुमकर चौकामध्ये ट्रॅफीकमध्ये थांबलेले असताना पाठीमागुन आलेला पाण्याचा टॅंकर वरील चालक नमुद आरोपी याने जोरजोराने हॉर्न देवुन फिर्यादीला अश्लील शिवीगाळ करुन त्याला फिर्यादी व वाहतुक पोलिस समजुन सांगत असताना त्याने साहेब तुम्ही माझी कम्पलेंट घ्या, हिचेकडे मी नंतर बघतो व अश्लील शिवी देवुन माझा मालक इथला विनोदे वस्तीचा गाववाला आहे, असे म्हणुन फिर्यादी यांचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे शब्द वापरुन स्वत दारुचे नशेमध्ये शिवीगाळ केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | सपोनि खारगे ९०११००२३३३ |

४.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | हिंजवडी ५६८/२०२३ भा.द.वि.कलम ४०६,४२० व माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६ सी, ६६ डी |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २५/०३/२०२३ रोजी सायं. १८/३० ते १९/०० वा. चे दरम्यान व दि २६/०३/२०२३ रोजी सायं. १८/०० वा. सुमारास रा. आर.उच.३२, साईकमल बिल्डींग, रामनगर कॉलनी, बावधन, पुणे. येथे असतांना |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०४/२०२३ रोजी २२/५२ वा |
| फिर्यादी | :- | अंजूम जहा जी बेल वय ५४ वर्षे धंदा- नोकरी रा. आर.उच.३२, साईकमल बिल्डींग, रामनगर कॉलनी, बावधन, पुणे. |
| आरोपी | :- | गुगलकडून मिळालेला नंबर वरिल बोलणारा इसम, व्हॉटसअप मोबाईल नंबर यावरुन क्युआर कोड पाठविणारा इसम व अकाउंट नंबर व आयएफएससी कोड- सीएनआरबी धारक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांना गुगलकडून मिळालेला नंबर वरील इसमाने फिर्यादीला झोलो ॲप डाऊनलोड करण्यास सांगून व्हॉटसअप मोबाईल नंबर यावरुन क्युआर कोड त्यांना पाठवून फिर्यादी यांना वेळोवेळी रक्कम ट्रान्सफर करण्यास सांगितले परंतू पैसे कट झाले नाहीत त्यानंतर दिनांक २६/०३/२०२३ रोजी सायं. १८/०० वा. सुमारास त्यांचे पंजाब नॅशनल बँक पाषाण शाखा पुणे अकांउट नंबर या अकाउंटवरुन वेळोवेळी फिर्यादी यांचे अकाउंटमधून पैसे गेलेले अकाउंट नंबर व आयएफएससी कोड- सीएनआरबी असा असून या अकाउंटधारकाने फिर्यादी यांची ऑनलाईन फसवणूक करुन ४९,९९५/- रुपये रक्कम काढून घेऊन फिर्यादी यांची फसवणूक केली आहे. म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि साळुंखे ९०११०११४१७ |

५.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु.रजि.नं. | :- | वाकड ४२०/२०२३, भा.द.वि.कलम ४२०,३४ माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ सी, ६६ डी |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २२/०४/२०२३ रोजी ते दिनांक २६/०४/२०२३ रोजी दरम्यान मोबाईल फोनव्दारे |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०४/२०२३ रोजी १९ / ११ वा |
| फिर्यादी | :- | महिला फिर्यादी |
| आरोपी | :- | मोबाईल क्र. धारक, आयडीबीआय बँक अकाउंट नं. धारक, युपीआय आयडी क्रज आयसीआयसीआय बँक अकाउंट नं. धारक, एस बँक अकाउंट नं. धारक, एस बँक अकाउंट नं. धारक, एस बँक अकाउंट नं. धारक या अकाउंट धारक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांचे मोबाईल नंबरवर अनोळखी मोबाईल नंबर यावरुन व्हाटसअप मेसेज करुन पार्टटाईम नोकरी आहे, तुम्ही घरी राहुन नोकरी करु शकता असे खोटी बतावणी करुन, टास्क खेळण्यास फिर्यादीस भाग पाडुन सुरुवातीला ३० टक्के प्रमाणे फिर्यादीला पैसे देवुन फिर्यादीचा विश्वास संपादन करुन पैश्याचे आमिष दाखवुन खोटे आश्वासन देवुन फिर्यादीकडुन वेगवेगळ्या बँकेत रक्कमा जमा करण्यास लावुन फिर्यादीची एकुण ३,४०,०००/-रु. ची आर्थिक फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गिरणार ९८८१०९७७१९ |

०६.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | सांगवी १९९/२०२३ भा. द. वि कलम ३७९ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २८/०४/२०२३ रोजी रात्रौ १२/३० वा ते दि. २९/०४/२०२३ रोजी स. ०९/३० वा. चे.दरम्यान रोड नं ३ उन्नती बँकचे बाजूला दत्ता कृपा बिल्डींग प्लॅट नं. ४ पिंपळे गुरव पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०४/२०२३ रोजी १३ /३९ वा |
| फिर्यादी | :- | प्रमोद बाबु कदम वय. ४० वर्षे धंदा व्यवसाय रा.रोड नं. ३ उन्नती बँकचे बाजूला दत्ता कृपा बिल्डींग प्लॅट नं. ४ पिंपळे गुरव पुणे |
| आरोपी | :- | अज्ञात चोरटा |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांची २,००,०००/- रु किंमतीची टाटा कंपनीची सुमो गाडी नं एम एच १४ सीएक्स १५१२ ही लॉक करुन पार्क केली असता ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी करुन नेली आहे तसेच शेजारील नवीन बिल्डींगमधील ३०,०००/- रु किंमतीचे लोखंडी प्लेटा कटर मशिन, सिकंजे असा एकुण २३००००/- रु किंमतीचा माल चोरी करुन नेला आहे म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि गावंडे ९०२८०४३३२६ |

०७.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | हिंजवडी ५६६/२०२३ भा.द.वि.कलम २७९,३०४(अ) मोटार वाहन कायदा कलम १८४ |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २८/०४/२०२३ रोजी २१/४० वाजताच्या सुमारास मायकार शोरुच्या समोर, मुंबई-बेंगलोर हायवेवर, मुंबईकडे जाणाया मधल्या लेनवर, वाकड, पुणे |
| गुन्हा दाखल | :- | दि. २९/०४/२०२३ रोजी ०८/१६ वा |
| फिर्यादी | :- | सचीन दिनकर सानप, पोशि १७४२ नेमणुक :- हिंजवडी पोलीस ठाणे, पिंपरी चिंचवड |
| आरोपी | :- | सुजीत विकास चव्हाण वय ३२ वर्षे धंदा चालक, रा ४०३, राजकृपा आपार्टमेंट, शिवसुंदर सोसायटीजवळ, आनंदनगर, बदलापुर, ठाणे<br>**आरोपी अटक नाही** |
| तपशिल | :- | नमुद तारखेस वेळी व ठिकाणी यातील आरोपी याने त्याचे ताब्यातील एसटी महामंडळाची शिवनेरी बस क्र एम.एच.०६/एस.९४२९ ही रस्त्याचे परीस्थीतीकडे दुर्लक्ष करुन बेदरकारपणे व हयगयीने चालवून अनोळखी इसम वय अंदाजे ५० ते ५५ यास बस ची धडक लागुन गंभीर दुखापत होवून त्याचे मृत्युस कारणीभूत झाला म्हणून |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि यलमार ९४२३२३९९४३ |

०८.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | वाकड ४२१/२०२३, भा.द.वि.कलम ४२०, ४०६, ४१९, ३४ माहीती तंत्रज्ञान अधिनियम (सुधारीत) कायदा २००८ चे कलम ६६ सी, ६६ डी |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि १३/०३/२०२३ रोजी ते दिनांक ०६/०४/२०२३ रोजी दरम्यान मोबाईल फोनव्दारे |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०४/२०२३ रोजी २०/३७ वा |
| फिर्यादी | :- | अमर अनिल लोमटे वय-२३ वर्षे धंदा-सॉफ्टवेअर इंजिनियर रा.शिवराम हाईटस, फ्लॅट नं.४०१,मंगलनगर,लेन नं.४, डांगे चौक, थेरगांव, पुणे मुळगांव-वांजरखेडागांव, ता.जि. लातुर |
| आरोपी | :- | मोबाईल क्र. ९३८२५८३९८२ धारक, युपीआय आयडी क्र. biswa5567@axl, gurmeetsingh5704@upi, tedberkar5961@barodampay व ravi6941@freecharge धारक, आयसीआयसीआय बँक अकौंट नं. ४४७६०५५०००३७ धारक, एस बँक अकौंट नं. ०४१९६३४००००००६६५ धारक, एस बँक अकौंट नं. १०२५६३३००००१०४२ धारक, आयसीआयसीआय बँक अकौंट नं.१२२१०५००१४४० धारक, एस बँक अकौंट नं. १०३२६३३००००१००२ धारक, व आयसीआयसीआय बँक अकौंट नं. ००१८०५०२०३६६ धारक |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी ९३८२५८३९८२ या मोबाईल नंबरवरुन फिर्यादी यांचा वाटसअप मोबाईल नं.९०९६३६९३६४ यावर मेसेज आला की, तुम्हांला जॉब ऑफर देण्यात येईल व तुम्हांला युटयुब वरती विडीओ लाईक करुन प्रत्येक विडीओला ५० रुपये व व्हीआयपी मेंबर झाल्यावर १००/- रुपये देण्यात येतील तसेच व्हीआयपी मेंबर होण्यासाठी प्रिपेड टास्क पुर्ण करावे लागतील त्यासाठी icoin1.com या वेबसाईट वरती इनव्हेस्ट करावी लागेल. त्यानुसार फिर्यादीने दि.१४/०३/२०२३ रोजी ५,९२,४००/- (पाच लाख ब्यानव्व हजार चारशे रुपये) दि.३१/०३/२०२३ रोजी ७,००,०००/-(सात लाख रुपये) व दि.०६/०४/२०२३ रोजी ५,८८,०००/- (पाच लाख अंठठयाऐंशी हजार रुपये) नेट बँकींगद्वारे फिर्यादी यांचा विश्वास संपादन करुन पैश्याचे आमिष दाखवुन खोटे आश्वासन देवुन फिर्यादीकडुन वेगवेगळ्या बँकेत रक्कमा जमा करण्यास लावुन एकुण १८,८०,४००/-रु. ची आर्थिक फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि दिवटे ८६०५१५७१५७ |

०९.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | शिरगाव ११३/२०२३ भा.द.वि ४०६,४२० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २७/०४/२०२३ रोजी दुपारी २.३० वा. चे सु।। मौजे उर्से ता. मावळ जि. पुणे येथे फिनोलेक्स पाईप कंपनीसमोर |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०४/२०२३ रोजी २०/१५ वा |
| फिर्यादी | :- | हरीश्चंद्र दादाहरी कांबळे वय ३९ वर्षे धंदा ट्रान्सपोर्ट रा. १२४, काळा खडक, वाकड ता. हवेली जि. पुणे |
| आरोपी | :- | अक्षय बाळु वाघमारे रा. काळा खडक, वाकड, पिंपरी चिंचवड मुळ रा. कोरेगाव ता. कर्जत जि. अहमदनगर **आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी हे त्यांचा ट्रक नं. एम एच ०४ सी यु २७३३ मध्ये माल भरण्यासाठी लाईनला थांबले असताना त्यांचे ओळखीचा नमुद आरोपी याने फिर्यादीचा ओप्पो कंपनीचा मोबाईल फोन त्यामध्ये आयडीया कंपनीचे सिमकार्ड असलेला त्याचे आईला फोन करायचा आहे असे सांगुन फिर्यादीकडुन मागुन घेउन मोबाईल फोनवर बोलत असल्याचा बहाणा करत तेथुन निघुन जाउन मोबाईल फोन मधील गुगल पे ॲपला फिर्यादीचा कॉमन नंबर २७३३ हा पासवर्ड ट्राय करून त्याव्दारे गुगल पे ॲप उघडुन १,२८,८९५/- रूपये वेगवेगळ्या अकाउंटला ट्रान्सफर केले आहेत. अशा प्रकारे ताब्यात घेतलेल्या १०,०००/- रू किंमतीचे ओप्पो मोबाईलचा अपहार करून त्यामधुन १,२८,८९५/- रूपये वेगवेगळ्या अकाउंटला ट्रान्सफर करून माझी फसवणुक केली आहे. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोना कवडे ९६०४७८७७०९ |

१०.

| | | |
|---|---|---|
| पोस्टे व गु रजि.नं. | :- | निगडी २८३/२०२३ भादवि कलम ३२८, २६९, २७०, २७२, २७३, १८८, ३४ सिगारेट व तंबाखुजन्य जाहिरात प्रतिबंधकायदा सन २००३ चेकलम ७, २० |
| गु.घ.ता.वेळ व ठि. | :- | दि २९/०४/२०२३ रोजी १५.१० वा.चेसुमारास गंगा नगर रोडवर असलेल्या बिनाइंग्लिश मिडीयम स्कुलचे समोर रस्त्याचे कडेला |
| गुन्हा दाखल | :- | दि २९/०४/२०२३ रोजी २०.४५ वा |
| फिर्यादी | :- | प्रसाद मारुती कलाटे, पोलीसनाईक १७७९, वय - ३२ वर्षे, पोलीस शिपाई, अंमली पदार्थविरोधी पथक, गुन्हे शाखा, पिंपरी - चिंचवड पोलीस आयुक्तालय |
| आरोपी | :- | अतुल दिलीप छाजेड, वय ३६ वर्षे, रा प्रभुकुंज सोसायटी, घरक्र १२, यमुनानगर, निगडी, पुणे<br>**आरोपी अटक आहे** |
| तपशिल | :- | नमुद तारीख वेळी व ठिकाणी नमुद आरोपी हा त्याचे कडील टि.व्ही.एस.ज्युपीटर या गाडीवर मा.अन्नसुरक्षा आयुक्त,महाराष्ट्रराज्य यांचे क्रमांक असुमाअ/अधिसुचना-५००/७ प्रमाणे दि २०/०७/२०२२ पासुन पुढील १ वर्षापर्यंत जारी केलेल्या आदेशाचे उल्लंघन करुन शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखुजन्य/गुटखा/सुंगधी सुपारी पदार्थाचे सेवनाने मुखाचे कर्करोग व इतर विकार होऊन शारिरीक हानी होऊ शकते हे माहित असताना देखील एकुण १,११,२९०/- रुपये किंमतीचा माल ज्यामध्ये ६,२९०/- रुपये किंमतीचा वेगवेगळया कंपनीचा शासनाने प्रतिबंधीत केलेला गुटखा, सुगंधीत तंबाखु व पान मसाला १५,०००/- रुपये किंमतीची प्रतिबंधीत सिगारेटची पाकिटे, ६०,०००/- रुपये किंमतीची चॉकलेटी रंगाची टि.व्ही.एस. कंपनीची ज्युपिटर हि दुचाकी गाडी जिचा आर.टी.ओ.क्र. एम.एच.१४/के.के./४६१३ असा असलेली व ३०,०००/- रुपये किंमतीचा मोबाईल असा माल स्वतःचे फायद्याकरीता अवैधरित्या खरेदी करुन फिरुन विक्रीकरीता जवळ बाळगताना मिळुन आला. म्हणुन |
| त.अधिकारी/अंमलदार | :- | पोउपनि केकाण ९४२१०४९६२३ |